# दिल्लीतील कायदा सुव्यवस्था धोक्यात! केजरीवालांची शहांवर टीका

■ नवी दिल्ली

**नवी** दिल्लीतील कायदा व सुव्यवस्थेचे तीन तेरा वाजले असून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राजधानीत कायद्याची चेष्टा चालवली आहे अशी खरमरीत टीका दिल्लीचे माजी मुख्यमंत्री व आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी केली आहे. समाजमाध्यमावरील आपल्या पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे की, संपूर्ण दिल्ली सध्या दहशतीत आहे. गल्ली बोळांमध्ये गोळीबार होत आहे. व्यापाऱ्यांना धमक्या दिल्या जात आहेत. दिवसाढवळ्या हत्या होत आहेत. मी आज नागंलोईमध्ये अशा दोन कुटुंबांना भेटायला गेलो ज्यांच्या दुकानावर दिवसाढवळ्या गोळ्या चालवण्यात आल्या.

# मुरबाडमध्ये आंतरराष्ट्रीय संत संमेलन व दर्शन आशिर्वचन महा सन्मान सोहळ्याचे आयोजन

■ मुरबाड

**मुरबाड** तालुक्यातील श्रीक्षेत्र संगमेश्वर येथे ९ ते १३ डिसेंबर या काळात आंतरराष्ट्रीय व संत संमेलन व दर्शन आशिर्वचन महासन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. देशातील १११ तपस्वी साधू-संत, महंत, आध्यात्मिक गुरू या संत संमेलनात उपस्थित रहाणार असून भाविकांना दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

९ डिसेंबर रोजी दुपारी साडेतीन वाजता मुरबाड तालुक्यातील सरळगाव ते श्रीक्षेत्र संगमेश्वर असा मिरवणूक सोहळा व महारथ यात्रा आयोजित करण्यात आली आहे .९ ते १३ डिसेंबर असे पाच दिवस मुरबाड तालुक्यातील श्रीक्षेत्र संगमेश्वर येथे हा कार्यक्रम होणार आहे. ५ दिवस दररोज सायंकाळी साडेपाच ते साडेसात वाजताच्या दरम्यान संत आगमन, दिप प्रज्वलन, प्रमुख पाहुण्यांचे सन्मान, संतांचे आशिर्वचन, पसायदान व महाप्रसादाचा लाभ अशी कार्यक्रमाची रूपरेषा असणार आहे. तर १२ डिसेंबर रोजी सायंकाळी सात ते नऊ धर्मगुरू अमृता श्रम स्वामी महाराज बिड यांचे कीर्तन होणार आहे.

# तासगाव अर्बन बँकेत चोरीचा प्रयत्न फसला

■ सांगली

**सांगली** शहरातील मार्केट यार्ड परिसरातील तासगाव अर्बन बँकेत काल रात्री करण्यात आलेला चोरीचा प्रयत्न फसला असून हा सारा घटनाक्रम सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. सांगलीतील या बँकेच्या शाखेत काल मध्यरात्री दोन चोरांनी प्रवेश मिळवला. त्यांनी आधी बँकेबाहेरच्या अलार्मची वायर कापली, त्यानंतर शटर फोडून बँकेत प्रवेश केला. यावेळी त्यांनी बँकेची स्ट्राँग रुम कटावणीच्या सहाय्याने फोडण्याचा प्रयत्न केला त्यात त्यांना यश आले नाही. अलार्मची वायर कापल्याची माहिती बँक मॅनेजरांना मिळाल्यामुळे त्यांनी ती पोलिसांना दिली.

# तामिळनाडूत फादर स्टॅन स्वामी यांचा पुतळा उभारण्यास कोर्टाची परवानगी

■ चेन्नई

**खासगी** मालकीच्या जागेमध्ये कोणाही व्यक्तिला त्याच्या इच्छेनुसार एखादे स्मारक अथवा पुतळा उभारण्यापासून सरकार रोखू शकत नाही,असा महत्वपूर्ण निर्वाळा मद्रास उच्च न्यायालयाने दिला. त्यामुळे तामिळनाडूमध्ये ख्रिश्चन धर्मगुरू आणि महाराष्ट्रातील भिमा-कोरेगाव एल्गार परिषद प्रकरणातील एक आरोपी दिवंगत स्टॅन स्वामी यांचा पुतळा उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तामिळनाडूच्या धर्मपुरी जिल्हातील रहिवासी पियुष सेठीया यांना आपल्या खासगी मालकीच्या भूखंडावर स्टॅन स्वामी यांचे स्मारक उभारायचे होते. मात्र स्टॅन स्वामी हे नक्षलवादाचे समर्थक होते असे सांगत तहसिलदारांनी त्यांचे स्मारक उभारण्यास परवानगी नाकारली. तामिळनाडू सरकार आणि कनिष्ठ न्यायालयानेही याच मुद्यावर स्टॅन स्वामी यांचे स्मारक उभारण्यास परवानगी नाकारली. स्टॅन स्वामी हे महाराष्ट्रातील भिमा-कोरेगाव येथील एल्गार परिषद प्रकरणातील एक आरोपी होते. खटला प्रलंबित असताना ५ जुलै २०२१ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या नक्षलवादी पार्श्वभूमीमुळे त्यांचे स्मारक उभारण्यास तामिळनाडू सरकार आणि कनिष्ठ न्यायालयाने परवानगी नाकारली होती.

# वक्फ बोर्डाच्या धर्तीवर सनातन बोर्डाची मागणी करणारी याचिका फेटाळली

■ नवी दिल्ली

**हिंदू** धर्माच्या हिताचे रक्षण करण्यासाठी वक्फ बोर्डाच्या धर्तीवर सनातन बोर्डाची स्थापना करण्याची मागणी करणारी याचिका आज दिल्ली उच्च न्यायालयाने फेटाळली. हा धोरणात्मक मुद्दा आहे, त्यामुळे न्यायालय त्यात हस्तक्षेप करू शकत नाही, असे उच्च न्यायालयाने म्हटले आहे.

याचिकाकर्त्यांची इच्छा असेल तर ते यासाठी त्यांच्या मागण्या सरकारकडे मांडू शकतात. आम्ही याबद्दल काहीही करू शकत नाही. ट्रस्ट स्थापन व्हावी, असे आम्ही म्हणू शकत नाही असे न्यायालयाच्या खंडपीठाने सांगितले. सनातन धर्माचे पालन करणाऱ्या लोकांवर इतर धर्माच्या लोकांकडून हल्ले केले जात आहेत. अशा परिस्थितीत सनातन समाजाच्या हिताचे रक्षण करणारी एखादी धार्मिक संस्था असावी अशी याचिका सनातन सेवा संघ संस्थेने दाखल केली होती. या याचिकेची सुनावणी आज सरन्यायाधीश मनमोहन यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर पार पडली.

# शेवंड मासळीचा हंगाम डिसेंबरपासून सुरू होणार



■ मुरुड जंजिरा

**आखाती** प्रदेशात आणि त्रितरांकित, पंचतारांकित हॉटेल्समधून लोकप्रिय असलेल्या शेवंड मासळीचा हंगाम मुरूड जंजिरासह आजूबाजूच्या परिसरात शेवंड मासळीचा हंगाम डिसेंबरपासून सुरू होणार असल्याचे राजपुरी येथे राहणारे होलसेल मासळी खरेदी-विक्री व्यावसायिक धनंजय गिदी यांनी सांगितले. राजपुरी, श्रीवर्धन तालुक्यातील खामदे, भरोडखोल, तळा येथील वाशी हवेली येथील मच्छीमार शेवंड मासळी विक्रीस आणतात. शेवंडला १७०० ते १८०० किलोला भाव मिळतो.

# ४ डिसेंबरपासून भालचंद्र महाराज पुण्यतिथी सोहळा

■ कणकवली



**कणकवलीचे** श्रद्धास्थान परमहंस भालचंद्र महाराज यांचा ४७ वा पुण्यतिथी महोत्सव ४ ते ८ डिसेंबर या कालावधीत विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांनी आश्रमात साजरा करण्यात येणार आहे.या उत्सवाची जय्यत तयारी सुरू आहे. या उत्सवानिमित्त होणाऱ्या कीर्तन महोत्सवात नामवंत कीर्तनकारांची कीर्तने ऐकण्याची संधी भाविकांना मिळणार आहे.

४ डिसेंबरला पहिल्या दिवशी समाधी पूजन, काकडआरती, सर्वभक्त कल्याणार्थ धार्मिक विधी, भालचंद्र महारूद्र महाभिषेक अनुष्ठान, आरती, महाप्रसाद, भजने, कीर्तन दैनंदिन आरती असे कार्यक्रम होणार आहेत. रविवार ८ डिसेंबर रोजी परमहंस भालचंद्र महाराज यांचा ४७ वा पुण्यतिथी दिन आहे. यादिवशी समाधी पूजन, काकड आरती जपानुष्ठान, भजने, समाधीस्थानी मन्यूसुक्त पंचामृत अभिषेक, महाप्रसाद, भजने, परमहंस भालचंद्र महाराज यांच्या पालखीची भक्तगण व सिंधुदुर्ग वारकरी संप्रदाय यांच्यासमवेत कणकवली शहरातून भव्य पालखी मिरवणूक आणि त्यानंतर आरती, दशावतारी नाटक असे कार्यक्रम होणार आहेत. तरी या महोत्सवाचा सर्व भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन परमहंस भालचंद्र महाराज संस्थानचे अध्यक्ष सुरेश कामत यांनी केले आहे.

# नवी मुंबई मेट्रोत बिघाड प्रवाशांची तारांबळ

■ बेलापूर

**नवी** मुंबईतील बेलापूर पेंधर मार्गावर चालणारी मेट्रो सेवा आज सकाळी सिग्नल यंत्रणेतील बिघाडामुळे काही काळ बंद पडली. सकाळच्या वेळेतच मेट्रो सेवा बंद पडल्याने अनेक प्रवाशांची तारांबळ उडाली. नवी मुंबई मेट्रोच्या सेंट्रल पार्क स्थानकातील सिग्नल यंत्रणेत सकाळी ८ च्या सुमारास बिघाड झाल्यामुळे ही मेट्रो बंद पडली. या मेट्रोतून हार्बरच्या रेल्वेस्थानकावर जाऊन पुढे मुंबई, ठाण्याला जाणाऱ्या प्रवाशांचा खोळंबा झाला. प्रवासी मेट्रो स्थानकात पोहोचल्यानंतर सुरक्षा रक्षकांकडून त्यांना मेट्रो बंद असल्याचे सांगण्यात आले.

# बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचाराचे आयपीएलमध्ये पडसाद! १२ खेळाडू शॉर्टलिस्ट

■ जेद्दा

**बांगलादेशात** सुरु असलेल्या हिंसक आंदोलनात हिंदूंना टार्गेट केले जात आहे. त्याचे पडसाद आयपीएलच्या लीलावातही उमटले . आयपीएलच्या लिलावात नोंदणी केलेल्या १२ बांगलादेशी खेळाडूंना कोणत्याही संघाने खरेदी केले नाही . यामध्ये लिटन दास, शाकिब हसन आणि मुस्तफिजूर रहमान यांच्या सारख्या स्टार खेळाडूंचा समावेश आहे. बांगलादेशातील हिंसाचाराच्या तीव्र प्रतिक्रिया भारतात उमटत आहेत. बांगलादेशी खेळाडूंना आयपीएल मध्ये घेऊ नका अशी मागणी सुरु होती. त्यामुळे सर्व फ्रेंचायजी धास्तावले होते. म्हणूनच त्यांनी कोणत्याही बांगलादेशी खेळाडूंवर बोली लावली नाही . वास्तविक शाकिब आले हसन, लिटन दास, मुस्तफिजूर रहमान हे आतापर्यंतच्या सर्व आयपीएल मध्ये वेगवेगळ्या संघातून खेळले आहेत.

# इस्त्रायली तंत्रज्ञानाने ईव्हीएम मशीन हॅक

## प्रशांत जगतापांचा आरोप

■ पुणे

**ईव्हीएम** मशीन हे इस्त्रायली तंत्रज्ञान वापरुन हॅक केले असल्याचा गंभीर आरोप शरदचंद्र पवार गटाचे हडपसर मतदार संघातील पराभूत उमेदवार प्रशांत जगताप यांनी केला आहे. एवढेच नाही तर नियोजन करून आमचा पराभव करण्यात आल्याचे देखील जगताप यांनी म्हटले आहे.

पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात महाविकास आघाडीच्या पराभूत उमेदवारांसह महत्वाचे नेते व पदाधिकाऱ्यांच्या बैठकीचे आज आयोजन केले होते. या बैठकीनंतर प्रशांत जगताप म्हणाले की, ईव्हीएममुळे आमचा पराभव झाला आहे. ईव्हीएम हॅक करुन सेट करुन आमचा पराभव केला आहे. या साठी आधीच नियोजन केले होते. हे सर्व जाणीवपूर्वक घडवले आहे.

ईव्हीएम मशीन इस्त्रायली तंत्रज्ञाने हॅक करण्यात आले आहे. या मशीनमध्ये पक्षचिन्ह व उमेदवारांचे चिन्ह टाकताना गोपनीयता बाळगली जाते. कोणते चिन्ह टाकले हे आम्हाला कळणार नाही. त्यामुळे या मशीनवर आम्हाला संशय आहे. या मशीनला खास प्रोग्राम दिला आहे. त्यानुसार मतदानाच्या दिवशी विशिष्ट वेळेत हे मशीन काम करील. या मशीनमध्ये टाइमिंग सेट केले होते.

# मतदानामध्ये तफावत झाल्याचा मनसे उमेदवाराचा आरोप फेटाळला

■ मुंबई

**दहिसर** विधानसभा मतदारसंघातील मनसेचे उमेदवार राजेश येरुणकर यांनी ईव्हीएम वर संशय व्यक्त केला आहे. त्यांच्या कुटुंबातील चार सदस्यांनी मतदान केलेल्या मतदान केंद्रावर त्यांना दोनच मते पडल्याचा दावा करत ईव्हीएम मशीनवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.मात्र पालिकेने त्यांचा हा आरोप फेटाळून लावला आहे. येरुणकर यांना २ नव्हे तर ५३ मते पडली असून त्यांच्या आरोपात कोणतेही तथ्य नसल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

राजेश येरुणकर यांनी आपल्या घरातील पत्नी, मुलगी, आईचेही मत मिळाले नाही हे कसे होऊ शकते असे म्हणत ईव्हीएममध्ये फेरफार केला असल्याचा आरोप केला होता. मुंबई उपनगर जिल्हा आणि मुंबई शहर जिल्हा या दोन्ही जिल्ह्यांच्या

## राजेश येरुणकर यांना २ नव्हे ५३ मते मिळाली

जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारीपदाची जबाबदारी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे सोपवण्यात आली.त्यामुळे राजेश येरुणकर यांच्या या आरोपांना महापालिकेने उत्तर दिले आहे.राजेश येरुणकर यांच्या आरोपात कोणतेही तथ्य नसल्याचे पालिकेने म्हटले आहे. पालिकेने चार मुद्द्यांच्या आधारे येरुणकर यांचे आरोप फेटाळून लावले आहेत.१७ सी फॉर्म आणि ईव्हीएम



मशीन यामधील एकूण मतदानाची आकडेवारी तसेच मशीनचा क्रमांक तंतोतंत जुळत आहे. त्यांना त्या मतदानकेंद्रावर ५३ मते मिळाली आहेत. मतमोजणी दिवशी कोणतीही लेखी तक्रार दहिसर विधानसभा मतदारसंघ येथील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

# संजय राऊतांची खासदारकी धोक्यात येण्याची शक्यता

■ नवी दिल्ली

**विधानसभा** निवडणुकीत महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाल्यामुळे या पक्षाच्या सदस्यांना येणाऱ्या राज्यसभा निवडणुकीतही निवडून येणे अशक्य होणार आहे. त्यामुळे या पुढील काळात त्यांच्यापैकी अनेक खासदारांची खासदारकी धोक्यात आली असून त्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांची खासदाकीही धोक्यात येण्याची शक्यता आहे.

पुढच्या वर्षी २ एप्रिल रोजी राज्यसभेतील सहा सदस्य निवृत्त होत आहेत. त्यात मविआचे ४ तर महायुतीच्या २ खासदारांचा समावेश आहे. विधानसभेतील



संख्याबळाच्या आधारे मविआने एकत्रित निवडणूक लढवल्यास त्यांना राज्यसभेतील एकच जागा जिंकता येऊ शकते. उर्वरित ३ जागा गमवाव्या लागू शकतात. तर, महायुतीकडील संख्याबळामुळे त्यांना राज्यसभेत ५ जागांवर सहज विजय मिळू शकतो. २०२८ मध्ये संजय राऊत यांचाही कार्यकाळ संपत आहे. त्यांना पुन्हा निवडून येणे अवघड बनले आहे. राज्यसभेत महाराष्ट्राच्या एकूण १९ जागा आहेत. शरद पवार, प्रियंका चतुर्वेदी, फौजिया खान , रजनी पाटील हे मविआचे ४ आणि भाजपचे धैर्यशील पाटील आणि रिपाइंचे रामदास आठवले असे एकूण ६ खासदार २ एप्रिल २०२६ रोजी निवृत्त होणार आहेत. पाच महिन्यांत राज्यसभेची निवडणूक होईल.

# पुणे पोलीस दलातील लाडक्या लिओचा मृत्यू

**पुणे- पुणे** पोलिसांच्या गुन्हे शाखेत गेल्या ८ वर्षांपासून कार्यरत असलेला लाडका श्वान लिओचा आजारपणाने मृत्यू झाला. लिओने मेफेड्रोनसह अमलीपदार्थांचा साठा पकडून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. पोलीस दलाने शोकाकूल वातावरणात सलामी गार्डने लिओला अखेरची मानवंदना दिली.

लॅब्रोडोर जातीच्या लिओचा जन्म जुलै २०१६ मध्ये झाला. तो ४ महिन्यांचा असताना सप्टेंबर २०१६ मध्ये पुणे पोलीस दलातील श्वानपथकात त्याचा समावेश करण्यात आला.


**वाडा नगरपंचायत**
**ता. वाडा जि. पालघर**
मु.पो.ता.वाडा जि. पालघर पिन - ४२१३०३
Email ID- nagarpanchayatwada@gmail.com फोन नं. ०२५२६-२७२०३८
जा.क्र. वानप/ ४०७६/२०२४ दि. २७/११/२०२४

**जाहीर सूचना**

वाडा नगरपंचायत हद्दीतील नगरपंचायत मालकीच्या रस्त्यांवरील खड्ड्यांची तक्रार दाखल करण्यासाठी संपर्क क्रं. ९९२२७७०५५० उपलब्ध करून देण्यात येत आहे. तरी रस्त्यांवरील खड्ड्यांची तक्रार वरील संपर्क क्रमांकावर करावी ही विनंती.

सही/-
मुख्याधिकारी
वाडा नगरपंचायत



**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**ई-निविदा सूचना**

| | |
|---|---|
| विभाग | मुख्य अभियंता (मलनिःसारण प्रचालन) |
| अनुभाग | उप मु.अभि. (म.प्र.) शहर<br>कार्य. अभि. यांत्रिक (एस) वांद्रे झोन |
| निविदा क्र. | १. २०२४_बृमुंमपा_१११७५६६<br>२. २०२४_बृमुंमपा_१११७५६७ |
| विषय | १. इन्फ्ल्यूएन्ट पंपिंग स्टेशन वांद्रे येथे मुख्य पंप पी-२०२ ची दुरुस्ती.<br>२. वांद्रे इन्फ्ल्युएन्ट पंपिंग स्टेशन येथे पथ दिवे आणि इल्युमिनेशन प्रणालीची दुरुस्ती, चाचणी आणि कार्यान्वयन. |
| निविदा विक्री | दि. २८.११.२०२४ रोजी ११.०० वाजेपासून<br>दि. १०.१२.२०२४ रोजी १६.०० वाजेपर्यंत |
| वेबसाईट | https://mahatenders.gov.in |
| संपर्क व्यक्ती | कार्य. अभि. यांत्रिक (एस) वांद्रे झोन |
| अ) नाव | श्री. ए. जे. चव्हाण |
| ब) दूर. क्र. (कार्यालय) | ०२२ २४४६४७५० |
| क) मोबाईल क्र. | ८७७९२७०५७५ |
| ड) ईमेल आयडी | ipsbandra@gmail.com |

सही/- १७.१०.२०२४
उ.मु.अभि. (म.प्र.) शहर
सही/-
कार्य.अभि. यांत्रिकी (म)
पीआरओ/१८४२/जाही./२०२४-२५ वांद्रे विभाग

खिडक्यांसाठी जाळ्यांचा व मच्छरदाण्यांचा वापर करा.


# संजय दिना पाटलांना दिलासा विरोधी आव्हान याचिका फेटाळली

■ मुंबई

**ईशान्य** मुंबई लोकसभा मतदारसंघातून शिवसेना ठाकरे पक्षाचे संजय दिना पाटील हे खासदार आहेत. या खासदारकीला आव्हान देणारी याचिका काल उच्च न्यायालयाने फेटाळल्याने पाटील यांना मोठा दिलासा मिळाला आहे. आवश्यक नियमांची पूर्तता करण्यास याचिकाकर्ते अपयशी ठरल्याचे निरीक्षण न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या एकलपीठाने नोंदवले.



# लखीमपूर खेरी हिंसाचारप्रकरण आरोपी आशिष मिश्राला दणका

■ नवी दिल्ली

**उत्तर** प्रदेशमधील बहुचर्चित लखीमपूर खेरी हिंसाचार प्रकरणातील मुख्य आरोपी आशिष मिश्राला सुप्रीम कोर्टाने आज नोटीस बजावली. आशिषवर साक्षीदारांना धमकावल्याचा आरोप असून सुप्रीम कोर्टाने आशिष मिश्रा यांचे वकील सिद्धार्थ दवे यांना प्रतिज्ञापत्र दाखल करण्यास सांगितले. २०२१ मध्ये लखीमपूर खेरी येथे झालेल्या हिंसाचारात आठ जणांचा मृत्यू झाला होता. माजी केंद्रीय मंत्री अजय मिश्रा यांचा मुलगा आशिष मिश्रा या प्रकरणात मुख्य आरोपी आहे. सध्या आशिष मिश्रा जामिनावर बाहेर आहे. तो साक्षीदारांना धमकावत असल्याची याचिका तक्रारदाराने सुप्रीम कोर्टात दाखल केली होती. आजच्या सुनावणीत आशिष मिश्राच्या वकिलाने सर्व आरोप फेटाळले. मात्र, सुप्रीम कोर्टाने आशिष मिश्राला ४ आठवड्यांत प्रतिज्ञापत्र सादर करून आरोपांवर उत्तर मागवण्यास सांगितले. ३ ऑक्टोबर २०२१ रोजी उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य यांच्या लखीमपूर दौऱ्याला शेतकऱ्यांनी विरोध केला होता. यावेळी चार शेतकऱ्यांचा कारने चिरडून मृत्यू झाला.

# चोपड्यात कुऱ्हाडीने वार! दोन मुलांची हत्या

■ जळगाव

**जळगाव** जिल्ह्यात चोपडा तालुक्यातील गौऱ्यापाडा येथे तरुणाने चारित्र्याच्या संशयावरून आधी पत्नीवर, नंतर दोघा लहान मुलांवर कुऱ्हाडीने वार केले. या हल्ल्यात दोघा मुलांचा मृत्यू झाला आणि महिला गंभीर जखमी आहे.

## पत्नी जखमी! पती अटकेत

या गावात संजय पावरा हा पत्नी भारती, पाच वर्षांचा मुलगा डेव्हिड आणि तीन वर्षांची मुलगी डिंपल यांच्यासह राहत होता. संजय हा कायम पत्नीशी चारित्र्याच्या संशयावरून वाद घालायचा. १८ नोव्हेंबर रोजी त्यांच्यात या विषयावरुन जोरदार भांडण झाले होते. त्यामुळे त्याची पत्नी दोन्ही मुलांसह मध्य प्रदेशच्या सीमेवरील तिच्या आत्याच्या गावी रांजणगाव येथे निघून गेली.

संजयच्या आई-वडिलांनी रांजणगावला जाऊन सुनेशी वाद घातल्यानंतर नातेवाईकांनी तिला माहेरी मध्य प्रदेशातील देवली येथे घेऊन गेले. त्यानंतर संजय पावरा हा देवलीत गेला. यावेळी पत्नीशी झालेल्या भांडणात त्याने कुऱ्हाडीचे वार करून दोन्ही मुलांची हत्या केली. पत्नीच्या डोक्यावरही कुऱ्हाडीने ५ ते ६ वार केले. लोकांनी पतीला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. पत्नीला धुळे येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.


**जाहीर सूचना**

माझे अशील मे. भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि., कांजुरमार्ग पूर्व शाखा, यांच्या विनंतीवरून याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील गाव पांचपाखाडी प्लॉट क्र. ४०, सेक्टर ४ श्री नगर, ठाणे पश्चिम ४००६०४ महाराष्ट्र च्या सर्व्हे क्र. ४२७ ते ४३५, आणि ४८५ वर वसलेल्या आणि असलेल्या "ज्योती प्रकाश बंगलो"च्या तळमजल्यावरील गायत्री सीएचएस लि. मधील दुकान क्र. ३ या मालमत्तेच्या गहाणवटीच्या बदल्यात ऋण सुविधेकरिता श्री. सतिश डब्ल्यू. म्हस्के आणि संगीता एस. म्हस्के या त्यांच्या ग्राहकांकडून प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्याच्या प्रक्रियेमध्ये आहेत.

माझ्या अशिलास असे दिसून आले आहे की, सदर मालमत्ता यापूर्वी श्रीमती ज्योती प्रकाशचंद्र जैन यांच्या मालकीची होती, ज्यांचे कोणतेही मृत्युपत्र न बनविता दि. ०७ फेब्रुवारी, २००० रोजी ठाणे येथे निधन झाले होते. त्यामुळे याद्वारे सूचना देण्यात येते की, कोणी व्यक्ती सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागावर सदर श्रीमती ज्योती प्रकाशचंद्र जैन यांच्याद्वारे किंवा वतीने विक्री, भेट, वारसा, प्रभार, गहाणवट, जप्ती इ. मार्गे कोणताही हक्क, शीर्षक किंवा हितसंबंध असल्याचा दावा करीत असल्यास, त्याने सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत निम्नस्वाक्षरीकारांना लेखी दावा सादर करणे आवश्यक आहे, असे न केल्यास असे मानण्यात येईल की, सदर मालमत्तेवर कोणीही दावेदार नाहीत, आणि निम्नस्वाक्षरीकार माझ्या अशिलास 'दावा प्राप्त झाला नाही' असे प्रमाणपत्र पारित करतील. त्यानंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही दाव्याचा कोणत्याही परिस्थितीमध्ये विचार करण्यात येणार नाही.

दिनांक २८ नोव्हेंबर, २०२४
ॲड. ललित वर्मा
ए-६०४, अजमेरा प्रिस्टाईन, योगी नगर, एक्सर रोड, बोरीवली पश्चिम, मुंबई - ४०००९१.
ईमेल: thelegalvision@gmail.com



**बोहरा फॅशन्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनात)**
**सीआयएन : U17120GJ2011PTC064273**
**ई-लिलाव विक्री सूचना**

इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (परिसमापन प्रक्रिया) विनियम, २०१६ च्या नियमन ३२ आणि ३३ नुसार बोहरा फॅशन्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनात) च्या मालकीचे प्लांट आणि मशिनरीची विक्री खालील मालमत्तेसाठी आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियम, २०१६ च्या नियमन ३३ अंतर्गत अनुसूची १ नुसार: ई-लिलाव प्रणाली https://right2vote.in/login द्वारे खाली स्वाक्षरी केलेल्याद्वारे विक्री केली जाईल.

| मालमत्ता | तपशिल | राखीव मूल्य (रू.) | इरठे रक्कम (रू.) | वाढीव मूल्य (रू.) |
|---|---|---|---|---|
| अहमदाबाद येथील इन्व्हेंटरी | इन्व्हेंटरी साइट पत्ता: डी-१७, तिसरा मजला, सफाल-१०, सरसपूर, अहमदाबाद | ८,३७,५००.०० | ८३,७५०.०० | १०,००००.०० |
| अहमदाबाद येथील प्लांट आणि मशिनरी-१ | संगणक, एअर कंडिशनर, पंखा, टेबल, खुर्ची, प्रिंटर, इन्डक्शन, लॅपटॉप, मेटल ड्रॉवर लॉक, सोफा, वजन माप, रेफ्रिजरेटर, बारकोड प्रिंटर, शिलाई मशीन, आणि स्टोरेज रॅक. साइट पत्ता: १) ३रा मजला आणि ८वा मजला, वाणिज्य भवन, कांकरिया, दिवाण बल्लूभाई शाळेसमोर, अहमदाबाद. २) डी-३१७, सुमेल १०, सरसपूर, अहमदाबाद, गुजरात. | १,१२,२८०.०० | ११,२२८.०० | १०,००००.०० |
| मुंबई येथील प्लांट आणि मशिनरी-१ | संगणक, एअर कंडिशनर, एक्वा गार्ड, प्रिंटर, टेबल आणि खुर्च्या. साइट पत्ता: युनिट-२६, पहिला मजला, स्वस्तिक इंडस्ट्रियल इस्टेट, सीएसटी रोड, कलिना, मुंबई. | १,३२,३००.०० | १३,२३०.०० | १०,००००.०० |

| | |
|---|---|
| आवश्यक फॉर्म, प्रतिज्ञापत्रे, घोषणापत्र इत्यादी सादर करणे | २८.११.२०२४ ते १२.१२.२०२४ पर्यंत |
| साइट भेट / निरीक्षण तारीख | १४.१२.२०२४ ते २२.१२.२०२४ पर्यंत |
| इरठे जमा करण्याची अंतिम तारीख | २४.१२.२०२४ |
| ई-लिलावाची तारीख आणि वेळ | दिनांक: २६.१२.२४<br>वेळ: दुपारी १२:०० ते दुपारी ०१:३० भाप्रवे |

**ईमेल आयडी:** liquidation.bohra@gmail.com; **मोबाईल क्र.: +९१ ९९३०३३११४६**
**ई-लिलाव सेवा प्रदाता:** Right2Vote InfoTech Private Limited
**ई-लिलावाच्या अटी आणि नियम खालीलप्रमाणे आहेत:**
१. मान्यताप्राप्त सेवा पुरवठादार, M/s. Right2Vote InfoTech Private Limited द्वारे **जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे आणि जसे आहे जे काही आहे** या तत्वावर ई-लिलाव आयोजित केला जाईल.
ही ई-लिलाव सूचना संपूर्ण ई-लिलाव प्रक्रिया माहिती दस्तऐवजाच्या संयोगाने वाचली जाईल ज्यामध्ये मालमत्तेचे तपशील, ई-लिलाव बोली फॉर्म, घोषणा आणि उपक्रम, ई-लिलाव विक्रीच्या सामान्य अटी व शर्ती उपलब्ध केल्या जातील. सोमवार ते शुक्रवार कामकाजाच्या वेळेत मोबाईल क्र.: **+९१९९३०३३११४६**, ईमेल आयडी: liquidation.bohra@gmail.com वर संपर्क साधून आणि ई-लिलाव सेवा प्रदात्याच्या वेबसाइटवर.
२. बोली सादर करण्यापूर्वी मालमत्ता आणि तपशीलाची तपासणी करणे आणि त्यांचे समाधान करणे ही बोलीदारांची जबाबदारी असेल. लिलावात ठेवलेल्या मालमत्तेची तपासणी साइटवर इच्छुक बोलीदारांना प्रकाशनाच्या तारखेपासून कागदपत्रे आणि इरठे सादर करण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत परवानगी दिली जाईल.
३. इच्छुक बोलीदारांनी केवायसी आणि इतर कागदपत्रांसह ई-लिलावात सहभागी होण्यासाठी विनंती पत्र सादर करावे. प्रारूप ई-लिलाव प्रक्रिया माहिती दस्तऐवजातून घेतले जाऊ शकतात. ही कागदपत्रे **१२ डिसेंबर २०२४** रोजी किंवा त्यापूर्वी वर दिलेल्या पत्त्यावर वास्तविक वितरण किंवा पोस्ट/कुरियरद्वारे परिसमापकाच्या कार्यालयात पोहोचली पाहिजेत. पात्र बोलीदारांनी **२४ डिसेंबर २०२४** रोजी किंवा त्यापूर्वी राखीव किंमतीच्या **१०%** इरठे जमा करण्यासाठी पुरावे सादर करावेत.
४. इच्छुक बोलीदारांनी बोहरा फॅशन्स प्रायव्हेट लिमिटेड परिसमापनात च्या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारे इसारा रक्कम ठेव (इरठे) रक्कम जमा करणे आवश्यक आहे.
५. ई-लिलाव प्रक्रियेसाठी आणि ई-लिलाव विक्री प्रक्रियेत भाग घेण्यापूर्वी बोलीदारांना त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी तपशीलवार अटी व शर्तींसाठी https://right2vote.in ला भेट देण्याची विनंती केली जाते.

प्रग्नेश जगासेठ
दिनांक: २८-११-२०२४ परिसमापक
ठिकाण: मुंबई बोहरा फॅशन्स प्रायव्हेट लिमिटेड परिसमापनात
नोंद क्रमांक: IBBI/IPA-001/IP- P02219/2020-2021/13456
पत्ता :३०२, तिसरा मजला, विजय नगर १, मजुरा गेट, रिंग रोड, सिड्स हॉस्पिटल, सुरत, गुजरात - ३९५००१.



**फॉर्म बी**
**जाहीर उद्घोषणा**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन १२)
**इन्फ्रा ड्रेज सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| अ.क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | इन्फ्रा ड्रेज सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थापनेचा दिनांक | ०५.०९.२००६ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले | आरओसी मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक/ मर्यादित दायित्व ओळख क्र. | U93090MH2006PTC164347 |
| ५. | कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | खोली क्र. ११०१, बी विंग, माऊंट एव्हरेस्ट बिल्डींग, आयमॅक्स ॲडलॅब्ज जवळ, ९ भक्ती पार्क, वडाळा पूर्व, मुंबई शहर, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००३७. |
| ६. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा दिनांक | ११.११.२०२४ (परिसमापकास दि. २६.११.२०२४ रोजी आदेश प्राप्त झाला) |
| ७. | कॉर्पोरेट ऋणकोचे परिसमापन सुरू होण्याचा दिनांक | ११.११.२०२४ (परिसमापकास दि. २६.११.२०२४ रोजी आदेश प्राप्त झाला) |
| ८ | परिसमापक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण पत्ता | स्सार्वी रेझॉल्युशन सर्व्हिसेस एलएलपी, त्यांचे भागीदार आणि प्राधिकृत स्वाक्षरीकार श्री. प्रशांत जैन यांच्या द्वारे नोंदणीकरण क्र.: IBBI/IPE-0144/IPA-1/2022-23/50008 |
| ९ | मंडळाकडे नोंदणीकृत असलेला परिसमापकाचा पत्ता आणि ई-मेल | पत्ता - बी-६१०, बीएसईएल टेक पार्क, सेक्टर ३०ए, वाशी रेल्वे स्टेशनसमोर, नवी मुंबई - ४००७०३. ईमेल आयडी: ssarviresolution@gmail.com |
| १० | परिसमापकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | द्वारा: स्सार्वी रिझॉल्यूशन सर्व्हिसेस एलएलपी पत्ता: बी-६१०, बीएसईएल टेकपार्क, सेक्टर ३०ए, वाशी रेल्वे स्थानकासमोर, नवी मुंबई - ४००७०३. वेबसाईट: www.ssarvi.com ईमेल : infradredge.cirp@gmail.com |
| ११ | दावा सादर करण्याचा अंतिम दिनांक | २६.१२.२०२४ |

याद्वारे सूचना देण्यात येते की, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी दि. ११.११.२०२४ रोजी **इन्फ्रा ड्रेज सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडचे** परिसमापन सुरु करण्याचे आदेश दिले. परंतु परिसमापकाद्वारे माननीय निबंधकांकडून आदेश दि. २६.११.२०२४ रोजी प्राप्त झाले.
**इन्फ्रा ड्रेज सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या** भागधारकांना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. २६.१२.२०२४ रोजी किंवा त्यापूर्वी परिसमापकाकडे बाब क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुरावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व भागधारक त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.
**दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.**
जर भागधारकांनी त्यांचे दावे परिसमापन प्रक्रियेदरम्यान सादर न केल्यास, अशा भागधारकाद्वारे कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रियेदरम्यान दाखल केलेले दावे भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ अन्वये कलम ३८ अन्वये दाखल केल्याचे मानण्यात येईल.

दिनांक: २८.११.२०२४ सही/-
ठिकाण: मुंबई स्सार्वी रेझॉल्युशन सर्व्हिसेस एलएलपी,
त्यांचे भागीदार आणि प्राधिकृत स्वाक्षरीकार श्री. प्रशांत जैन यांच्या द्वारे
नोंदणीकरण क्र.: IBBI/IPE-0144/IPA-1/2022-23/50008
इन्फ्रा ड्रेज सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणातील परिसमापक
एएफए वैधता दि. ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत